लोकमत पृ. पान क्र. १

# मुलांच्या भांडणावरून दोन कुटुंबांत राडा; चाकूने वार


लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : काशिमीरा भागातील मांडवीपाडा येथे दोन कुटुंबांत लहान मुलांच्या भांडणावरून राडा झाला. याप्रकरणी काशिगाव पोलिसांनी दोन्ही बाजूच्या फिर्यादीवरून गुन्हे दाखल केले आहेत.

मांडवीपाडा भागात राहणाऱ्या व मजुरीकाम करणाऱ्या कविता जस्वीर कागडा यांच्या फिर्यादीनुसार, लहान मुलांच्या भांडणावरून सौरभ अन्सारी, सबराना अन्सारी, सौरभची वहिनी आणि तिचा नवरा या चौघांनी मिळून तिला मारहाण करत जखमी केले. कविता हिच्या डाव्या हातावर चाकूने वार करत जखमी केले. तिचे केस खेचून ठोश्याबुक्क्यांनी मारहाण, शिवीगाळ केली व दुखापत केली म्हणून १६ एप्रिल रोजी काशिगाव पोलिसांनी सदर चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

सौरभ अन्सारी यांच्या फिर्यादीवरून कविता हिने त्याच्या डोक्यामध्ये कोणत्या तरी वस्तूने मारहाण करून जखम केले. त्यामुळे त्याला चार टाके पडले. कविताविरुद्ध काशिगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# गळफास घेत आत्महत्या



नालासोपारा : बिलालपाड्याच्या सत्यमेव जयते चाळीत राहणाऱ्या दीपक मेहरा (२८) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याला दारू पिण्याचे व्यसन होते. मंगळवारी त्यांनी कामावर न जाता दारूच्या नशेत घरी पत्नीसोबत भांडण करून शिवीगाळ केली होती. त्यानंतर त्याने राहते घरी येऊन छताच्या लोखंडी पाइपला ओढणी बांधून गळफास घेतला. पेल्हार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# महामार्गावर अनोळखी व्यक्तीचा अपघाती मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या मुंबई वाहिनीवर वसई फाटा ओव्हर ब्रिज, संस्कृती हॉस्पिटलजवळ झालेल्या अपघातात एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला.

पेल्हार पोलिस ठाण्यातील पोलिस शिपाई योगेश चौगुले (२४) हे बिट मार्शल म्हणून कर्तव्यावर असताना मंगळवारी पहाटे त्यांना अपघाताची माहिती मिळाली. अंदाजे ३५ ते ४० वर्षीय इसमास अज्ञात वाहनचालकाने भरधाव वेगात ठोकर मारल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्या व्यक्तीचे डोके व उजव्या हाताचा पूर्ण चेंदामेंदा होऊन, डाव्या हातावर जखमा झाल्या होत्या. या अपघातात त्या व्यक्तीचा डावा पाय गुडघ्यातून मोडला असून पायाच्या पंजाचा चेंदामेंदा झाला आहे. पेल्हार पोलिसांनी पळून गेलेल्या अज्ञात वाहनचालकाविरुद्ध फेटलचा गुन्हा दाखल केला आहे.

# पैशांच्या बॅगची कारमधून चोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : चेरी हाइट्समध्ये राहणारे व्यापारी दीपक यादव (३२) यांच्या कारमधून पैशांची बॅग चोरीला गेल्याची घटना घडली आहे. सोमवारी दुपारी शांतीकुटीर बिल्डिंगमध्ये असलेल्या महावीर कलेक्शनसमोर पार्किंग केलेल्या कारमधून पुढच्या सीटवर ठेवलेल्या बॅगमध्ये कंपनीतील कामगारांना वाटण्यासाठी ठेवलेले अडीच लाख रुपये होते. चोरट्याने ती बॅग चोरून नेली आहे. मंगळवारी तुळिंज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner
CS CamScanner

लोकमत पू. पान क्र. 1

# क्षुल्लक कारणावरून पेल्हारमध्ये तरुणाची हत्या

## गुन्हा दाखल : आरोपीला केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : दारूच्या नशेत शिवीगाळ केल्याचा राग मनात धरून आरोपीने तरुणाला जोरात धक्का देऊन त्याला खाली पाडले. त्याच्या पोटात लाथाबुक्क्यांनी मारहाण करून हत्या केल्याची घटना वाकणपाडा नाका येथे सोमवारी मध्यरात्री घडली आहे. मंगळवारी पेल्हार पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

वाकणपाड्याच्या विष्णू चाळ येथे राहणाऱ्या गीतादेवी बिन (३६) यांच्यासमोर पती अक्षयकुमार बिन (३६) यांची सोमवारी रात्री हत्या करण्यात आली आहे. वाकणपाडा नाका येथील विंध्यावासिनी देवीच्या मंदिरासमोर फळविक्री करणाऱ्या आरोपी शिवप्रसाद जयस्वाल याला अक्षयकुमार याने दारूच्या नशेत शिवीगाळ केली.

### लाथाबुक्क्यांनी मारहाण

याचा राग मनात धरून त्याला जोरात धक्का मारून जमिनीवर खाली पाडले. त्यानंतर आरोपीने त्याचे दोन्ही पाय उचलून त्याच्या पोटावर जोराजोरात लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारले आहे. गीतादेवी यांनी मंगळवारी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.



हत्येच्या गुन्ह्यात आरोपीला अटक करून वसई न्यायालयात हजर केल्यावर चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

\- अर्जुन पवार, सपोनि व तपास अधिकारी, पेल्हार पोलिस ठाणे

# ऑनलाइन फसवणूक; वर्षभरानंतर मिळाले पैसे

## मीरा रोड सायबर पोलिसांची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : पोलिस आयुक्तालयाच्या सायबर पोलिस ठाण्याने ऑनलाइन खरेदीत फसवणूक झालेल्या व्यक्तीस १ लाख ७६ हजार रुपयांची रक्कम एक वर्षाने परत मिळवून दिली.

वसईच्या वालीव येथील कौशल यांनी एप्रिल २०२३ मध्ये मीरा रोडच्या सायबर सेलकडे ऑनलाइन फसवणुकीची तक्रार दिली होती. घरगुती वस्तू खरेदी करताना सायबर लुटारूने ऑनलाइन पेमेंट करण्यासाठी क्यूआर कोड पाठवून त्यावर स्कॅन करण्यास सांगितले. कौशल यांनी क्यूआर कोड स्कॅन केला असता, त्यांच्या बँक खात्यातून १ लाख ७६ हजार ६४५ रुपये कापले गेले होते.

### पत्रव्यवहाराद्वारे केला पाठपुरावा

- यात्रकरणी सायबर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुजितकुमार गुंजकर व पथकाने केलेल्या तपासात फसवणूक झालेली रक्कम पंजाब नॅशनल बँकेच्या संशयित खातेधारकाच्या खात्यात वळती झाल्याचे समोर आले.
- पोलिसांनी त्या खात्यातील व्यवहार रोखण्यासाठी तसेच तक्रारदार यांची रक्कम मिळविण्यासाठी संबंधितांसोबत पत्रव्यवहार केला.
- फसवणुकीची रक्कम संशयित खात्यात गोठविण्यात आल्यानंतर न्यायालयात पाठपुरावा करून सर्व रक्कम तक्रारदारांच्या मूळ खात्यावर परत करण्यात आली.

# अल्पवयीन मुलाचा मृत्यू

नालासोपारा : मीरा गावठाणच्या महाजन वाडी येथे राहणारे संजय काविठिया (वय ३२) हे त्यांची पत्नी व तीन मुले सोमवारी मध्यरात्री टेम्पोमध्ये पाठीमागे बसून जात होते. मुंबई-अहमदाबाद हायवेच्या खानिवडे ब्रिजजवळ आल्यावर वाहनावरील चालकाने समोरच्या वाहनास जोराने धडक देऊन ब्रेक मारल्याने पाठीमागे असणारा मोठा लाकडी बॉक्स हा गाडीच्या पुढील केबिनकडे सरकल्याने केबिनला खेटून बसलेला त्यांचा मोठा मुलगा विराट (११) याच्याकडे येऊन लाकडी बॉक्स व गाडीच्या केबिनमध्ये दाबला गेल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याने टेम्पोचालक बेलीम सलीम खान याच्याविरोधात मांडवी पोलिसांनी मंगळवारी फेटलचा गुन्हा दाखल केला आहे.

# विरारमध्ये वाहन चोरीला

नालासोपारा : बरफपाड्याच्या ओम साई सहारा चाळीत राहणाऱ्या गणेश पठारे (२६) याची ४० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली आहे. ७ एप्रिलला रात्री राहत्या घराच्या बाहेर दुचाकी पार्क केली होती. चोरट्याने पार्किंग केलेली दुचाकी चोरून नेली आहे. विरार पोलिसांनी मंगळवारी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# माणिकपूरमध्ये घरफोडी



नालासोपारा : शास्त्रीनगरच्या सिल्व्हर सॅन्ड सोसायटीत राहणाऱ्या माधवराव वाडीकर (७०) यांच्या घरी सोमवारी दुपारी घरफोडी झाली. चोरट्याने घराच्या किचनमधील खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून काचेचे स्लाईडिंग सरकवून त्यावाटे घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातून १ लाखांचे सोन्याचे मंगळसूत्र, ६० हजारांचे कानातले व ३५ हजारांची रोख रक्कम असा एकूण १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. माणिकपूर पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे. माणिकपूर पोलिस अधिक तपास करीत आहेत.

CamScanner

CamScanner

लोकमत पान क्र. ५

# पारधी गँगविरोधात ६०० पानांचे दोषारोपपत्र

## सहा आरोपींविरोधात कारवाई : इतर आरोपींचा शोध सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पारधी गँगच्या सहा आरोपींविरोधात ६०० पानांचे दोषारोपपत्र वसई न्यायालयात मंगळवारी गुन्हे शाखेच्या युनिट-३ ने दाखल केले आहे. संघटितपणे गंभीर गुन्हे करणाऱ्या या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई केली.

४ जानेवारीला दरोड्याच्या तयारीत असलेले कुख्यात आंतरराज्यीय टोळीतील आरोपी मनीष ऊर्फ राजू मोहन चव्हाण, भाऊसाहेब शंकर गवळी, रवींद्रसिंग सुखराम सोलंकी, सुखचेन रेवत पवार, मॉन्टी नंदू चौहान, अश्विनी रूपचंद चव्हाण यांना गुन्हे शाखा कक्ष-३ चे अधिकारी व अंमलदारांनी ताब्यात घेतले. या आरोपींवर विरार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केला होता.

या प्रकरणात आरोपींविरुद्ध २९ फेब्रुवारीला अप्पर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक यांच्या परवानगीने महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमनुसार कलमांमध्ये वाढण्यात आली. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ हे करीत होते.



### आतापर्यंत केलेल्या गुन्ह्यांची नोंद

१ या आरोपींनी संघटितपणे टोळी तयार करून महाराष्ट्र राज्यातील पालघर, ठाणे, नाशिक, पुणे, सांगली, अहमदनगर, औरंगाबाद, तसेच मध्य प्रदेश व राजस्थान परिसरात खून, खुनासह दरोडा, सशस्त्र दरोडा, हत्येचा प्रयत्न, पोलिसांवर गोळीबार, जबरी चोरी, घरफोडी, चोरी असे अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे केले आहेत.


२ आरोपी सुखचेन पवार आणि रवींद्रसिंग सोलंकी हे २०१८ पासून राजस्थान व मध्य प्रदेश येथील दरोड्याच्या गुन्ह्यात फरार इनामी गुन्हेगार आहेत. या टोळीतील आरोपींनी दुबई येथील हॉटेल व्यावसायिकाचा शहापूर येथील त्याच्या फार्म हाऊसमध्ये खून केला होता.

म. टा. पू. पान क्र. १

# कर्ज मंजुरीवरून ११ लाखांचा गंडा

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

गृहकर्ज मंजूर करण्याच्या नावाखाली भाईंदरमधील एका दुकानदाराची ११ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. दुकानदाराच्या मित्राने व त्याच्या परिचित दोन एजंटने मिळून ही फसवणूक केल्याचे समजते. याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



चित्र : एआय

भाईंदर पश्चिमेच्या राजेश हॉटेलजवळ ज्ञानचंद्र राजभर यांचे खेळणीविक्रीचे दुकान आहे. घर खरेदी करायचे असल्याने राजभर घराचा शोध घेत होते. यादरम्यान त्यांचा मित्र कमलेश यादवने एजंट असणारे त्यांचे मित्र जयप्रकाश तिवारी व योगेंद्र सिंग यांच्याशी ज्ञानचंद्र यांची ओळख करून दिली. मिरारोडमध्ये घराच्या किंमती अधिक असल्याने पनवेल येथे स्वस्तात घर खरेदी करून देतो असे त्यांनी सांगितले.

त्याकरीता तिघांनीही ज्ञानचंद्र यांच्याकडून आवश्यक कागदपत्रे व कर्ज मंजुरीसाठी टप्प्याटप्प्यात एकूण ११ लाख रुपये घेतले. यासह कोरा धनादेश व इतर कागदपत्रेही घेण्यात आली होती. त्यानंतर ज्ञानचंद्र यांनी घराच्या कामासाठी फोन केला असता अनेक दिवस तिघांनाही कुठलाच प्रतिसाद दिला नाही. त्याबरोबरच त्यांनी दिलेल्या कोऱ्या धनादेशावर बनावट स्वाक्षरी करून ते बँकेत भरण्यात आले. म्हणून भाईंदर पोलिस ठाण्यात ज्ञानचंद्र यांनी तक्रार दाखल केली होती. त्यावरून तिघांवरही आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner
CamScanner

लोकसत्ता पु. पान क्र. १



# रामनवमीसाठी गावी जाणाऱ्या मुलाचा अपघाती मृत्यू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** रामनवमीसाठी गुजरातला चाललेल्या एका टेम्पोच्या झालेल्या विचित्र अपघातात ११ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर हा अपघात झाला. टेम्पो चालकाने अचानक ब्रेक मारल्याने टेम्पोतील लोखंडी बॉक्स कोसळून हा अपघात झाला.

संजयभाई कावठिया (३२) पत्नी आणि मुलांसह मिरा रोड जवळील काशिमिरा येथे राहतात. बुधवारी रामनवमी असल्याने त्यांना गुजराथ येथील सुरत या मूळ गावी जायचे होते. त्यांचा परिचित बेलीम खान (३९) हा आपला आयशर टेम्पो घेऊन गुजराथला जाणार होता. त्यामुळे कावठिया यांनी त्या टेम्पोतून जाण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी पहाटे ते काशिमिरा येथून आयशर टेम्पोतून निघाले होते. पहाटे साडेसहाच्या सुमारास खानिवडे टोल नाक्याजवळून टेम्पे जात असताना चालकाने अचानक ब्रेक मारला. यावेळी टेम्पोच्या मागे असणारा लोखंडी बॉक्स केबीनमध्ये पडला. केबीनमध्ये बसलेला विराट कावठिया (११) हा बॉक्सखाली दाबला गेल्याने त्याचा मृत्यू झाला. टेम्पोचालक भरधाव वेगाने वाहन चालवत होता. समोर ट्रक असल्याने त्याने अचान ब्रेक मारल्यामुळे हा विचित्र अपघात झाला आहे. आम्ही टेम्पो चालक बेलीम खान याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांनी दिली.

## पाऊणतास उपचाराविना

**आम्ही नेहमी गावी ट्रेन किंवा बसने जातो. परंतु रामनवमी असल्यामुळे आम्हाला लवकर जायचे असल्याने आम्ही खान याच्या टेम्पोतून गेलो असे मयत विराचटे वडील संजय कावठिया यांनी सांगितले. अपघात झाल्यानंतर आम्हाला रुग्णवाहिका मिळून उफचार मिळण्यास पाऊण तास लागले. कुणी मदतीला आले नव्हते असा आरोप विराटची आई भारती कावठियाने केला आहे. विराट हा ५ व्या इयत्तेत शिकत होता.**

# विद्यार्थिनींच्या आत्महत्येप्रकरणी गुन्हा दाखल

**वसई:** वसई पूर्वेच्या फादरवाडी परिसरात डिसेंबर २०२३ मध्ये विद्यार्थिनींने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. वर्गशिक्षिका व चुलते यांच्या त्रासाला कंटाळून ही आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वालीव पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

वसई पूर्वेच्या फादरवाडी सनशाईन ग्रीन पार्क येथे राहणारी धनश्री गायकवाड (१६) हिने १८ डिसेंबर २०२३ रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणी तिच्या आईने वालीव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार त्याचा तपास सुरू होता.

CamScanner
CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र. ४

# उपचाराच्या नावाखाली तरुणीवर अत्याचार

## नालासोपाऱ्यात स्वयंघोषित वैद्याविरोधात गुन्हा दाखल

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** उपचारासाठी आलेल्या २२ वर्षीय तरुणीवर नालासोपारा येथील एका स्वयंघोषित वैद्याने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नालासोपारा पोलिसांनी ६० वर्षीय स्वयंघोषित वैद्याच्या विरोधात बलात्कार आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरुणी २२ वर्षांची असून ती मुंबईत राहते. याप्रकरणी तिने नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पीडितेच्या तक्रारीनुसार नालासोपारा पश्चिमेच्या छेडानगर येथील गौरव गॅलक्सी अपार्टमेंटमध्ये बाबासाहेब पाटील हा डॉक्टर मूळव्याधीवर इलाज करतो.

मंगळवारी ती उपचारासाठी पाटील याच्याकडे आली होती. त्यावेळी पाटील याने पीडितेकडे शरीरसुखाची मागणी करून नंतर तिच्याशी लैंगिक कृत्य केले. या तक्रारीवरून नालासोपारा पोलिसांनी बाबासाहेब पाटील याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

बाबासाहेब पाटील नाशिक येथे राहणारा असून दर आठवड्याला नालासोपाऱ्यात उपचारासाठी येत असल्याने इमारतीच्या रहिवाशांनी सांगितले. पाटील हा डॉक्टर नसून त्याच्याकडे कुठलीही वैद्यकीय पदवी नाही. मात्र तो वैद्य असल्याचा दावा करून मागील ३० वर्षांपासून मुळव्याधीवर उपचार करत असल्याची माहिती नालासोपारा पोलीस ठाण्याचे सहाय्याक पोलीस निरीक्षक प्रमोद कदम यांनी दिली.

# समाजमाध्यमांवर पोलिसांची करडी नजर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** गेल्या काही दिवसांपासून मीरारोड आणि भाईंदर शहरात धर्मीयांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे पोलीस सतर्क झाले असून कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. समाजमाध्यमांवर धार्मिक तेढ निर्माण करणारा मजकूर प्रसारित करणे, तसेच त्याला लाइक आणि कमेंट करणाऱ्यांवरही कारवाई केली जाणार आहे.

मीरारोडमध्ये उसळलेल्या दंगलीनंतर शहरातील वातावरण वरकरणी शांत झाले आहे. मात्र काही असामाजिक तत्त्वांकडून शहरात तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एका चिमुरडीवर लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यानंतर असाच प्रयत्न झाला होता. त्यानंतर ४ अल्पसंख्याक पत्रकारांची बदनामी करणारा मजकूर समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आला होता. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कडक कारवाईचा इशारा दिला आहे. धर्मीयांमध्ये, समाजामध्ये, गटामध्ये तेढ निर्माण होईल या पद्धतीने कोणत्याही प्रकारचे संदेश 'व्हॉट्सॲप', 'ट्विटर, 'इंस्टाग्राम', 'फेसबुक', 'यूट्यूब' व इतर समाजमाध्यमांवर प्रसारित केल्यास तसेच अशा संदेशावर लाइक आणि कमेंट केल्यास संबंधितांना जबाबदार धरले जाणार आहे.

दोन वेगवेगळ्या धर्मीयांच्या, गटाच्या व समाजाच्या भावना दुखावून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्याबाबत दोषी धरून त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येईल, असे पोलीस आयुक्तांनी सांगितले.

CamScanner
CamScanner

सकाळ पू. पान क्र.2

# सोसायटीतील वाहनांवर कारवाई

## वाहतूक पोलिसांच्या नियमबाह्य टोईंग पद्धतीने नाराजी

विरार, ता. १७ (बातमीदार) : मुख्य रस्त्यांवरील रहदारीला अडथळा ठरणारी वाहने हटविण्याऐवजी वाहतूक पोलिस सोसायटी आवारातील वाहने उचलून नेत आहेत. त्यामुळे सामान्य नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. खासगी सोसायटी, आस्थापना, बँका, रुग्णालये आदी ठिकाणी विविध कामांनिमित्ताने जाणाऱ्या नागरिकांची वाहने नियमबाह्य पद्धतीने टोईंग केली जात आहेत. त्यामुळे आपली वाहने ठेवायची तरी कुठे, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडलेला आहे.

वसई-विरार शहरातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृतपणे उभी करण्यात येतात. दुचाकी, चारचाकी व फेरीवाले यांच्यामुळे दररोज रहदारीत अडथळा निर्माण होत असतो. परिणामी नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असते. अनेकदा शाळा मार्गांवर सकाळ-संध्याकाळच्या वेळात अनेक अवजड वाहने उभी केली जातात. अनेक दुकानदारांकडे माल घेऊन येणारी वाहने रस्त्यांवर उभी केली जात असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे विद्यार्थी, पालकांना शाळेत जाण्यास उशीर होतो. शहरात होणारी बेकायदा रिक्षा वाहतूक व सुसाट धावणारे अनधिकृत टँकर आणि त्यातून सांडणाऱ्या पाण्यामुळे कित्येकदा छोट्या-मोठ्या अपघातांना सामोरे जावे लागत असते. या तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करणे अपेक्षित असताना वाहतूक पोलिस केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप संजय राणे या नागरिकाने केला आहे. ही कारवाई चोरघे टॉवर सोसायटीच्या आवारात करण्यात आली होती.

बहुतांश सोसायटी, दुकानदार, बँका, आस्थापना यांच्याकडून वाहतूक पोलिसांनी तक्रार अर्ज प्राप्त करून घेतलेले आहेत. हे तक्रार अर्ज पुढे करून वाहतूक पोलिस सामान्य नागरिकांची वाहने टोईंग करत आहेत. मुळात तक्रार अर्जांनुसार वाहतूक पोलिसांनी सोसायटी, बँका, आस्थापना अथवा रुग्णालये यांच्यासमोरील मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने उचलणे अपेक्षित आहे. सोसायटी आवारात घुसून तेथील वाहने टोईंग करणे हे नियमबाह्य आहे. मात्र या तक्रार अर्जांचे कारण पुढे करत वाहतूक पोलिस सोसायटी आवारात बिनधास्त घुसखोरी करून वाहने उचलून नेत असल्याचे अनेक कारवाईंतून स्पष्ट झाले आहे.



### वाहने चोरीला गेल्याची धास्ती!

वाहतूक पोलिस घोषणा करून माहिती देण्याची औपचारिकता बजावत असले तरी; आपले वाहन सोसायटी आवारात असल्याने संबंधित आस्थापनेत कामानिमित्त येणारी व्यक्ती निर्धास्त असते. त्यांना तिथून वाहन उचलले जाईल, अशी अपेक्षा नसते. पण वाहतूक पोलिस तेथून वाहन उचलून नेत असल्याने काम आटोपून आलेली व्यक्ती आपले वाहन चोरीला तर गेले नाही ना, या भीतीने धास्तावतो. अधिक माहितीअंती त्याला सोसायटी आवारातील वाहने टोईंग केली जात असल्याचे कळते, तेव्हा तो आणखीच पेचात पडतो.

पत्नीसह मी फुलपाडा-स्टेशन रोडवरील बँकेत कामानिमित्त गेलो होतो. त्यावेळी माझी दुचाकी बँकेचे कार्यालय असलेल्या सोसायटीच्या आवारात पार्क केली होती. आम्ही बँकेत असताना वाहतूक पोलिसांची टोईंग व्हॅन आली होती. परंत वाहतूक पोलिसांनी त्या सोसायटीसमोरील मुख्य रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने टोईंग करण्याऐवजी सोसायटी आवारात पार्क केलेली माझी दुचाकी उचलून नेली.

**- संजय राणे**, चालक, विरार

कित्येकदा सोसायटी, बँका किंवा आस्थापनांसमोरील रस्त्यावर अनधिकृतपणे वाहने उभी केली जात असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. त्यामुळे आमच्याकडे तक्रारी येत असतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण करत असलेली वाहने आम्ही उचलत असतो. परंतु सोसायटीच्या आवारातून वाहने उचलून नेली जात असतील तर ते चुकीचे आहे. याबाबत आम्ही संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना सूचना करून अशा चुका करू नयेत, असे सूचित करू.

**- प्रशांत लांघी**, वाहतूक पोलिस निरीक्षक, वसई

CamScanner
CamScanner

समय भास्कर

# मानसून के पहले ट्रैफिक विभाग की समीक्षा बैठक

**पंकज दूबे/मीरा-भाईंदर**

मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के कार्यक्षेत्र में आने वाले काशीमीरा ट्रैफिक विभाग ने, मानसून के पहले शहर में चल रहे विभिन्न क्षेत्रों के सकड़ कार्यों का जायज़ा लिया और यह सभी कार्य मानसून के पहले पूरा हो इसलिए 16 अप्रैल को शाम 5.30 बजे इस विषय पर समीक्षा बैठक रखी गयी वरिष्ठ अधिकारियों की मार्गदर्शन में इस बैठक का आयोजन ट्रैफिक विभाग के पुलिस निरीक्षक देवीदास हंडोरे ने किया जहां ट्रैफिक विभाग के सहायक पुलिस आयुक्त के साथ विकास कार्यों मे लगे विभिन्न कंपनियों के प्रतिनिधि उपस्थित थे । ज्ञात हो कि शहर में सीमेंट कंक्रीट सड़क का निर्माण हो रहा हैं, और सूर्या प्रकल्प के अंतर्गत नये पाइप लाइन का कार्य भी हो रहा है, ट्रैफिक विभाग ने आम नागरिकों की सुरक्षा को ध्यान में रखकर उपस्थित प्रतिनिधियों को कहा कि इन सभी विकास कार्यों की जगह पर ट्रैफिक वार्डन, बैरिकेटिंग, रेडियम पट्टी, नाइट ब्लिंकर्स आदि रखा जाये ।



CamScanner